International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# जनजाती गौरव (Tribal Pride)

**श्री. कऱ्हाळे गोविंद सिताराम**
*इतिहास संशोधक, SRTMU, नांदेड*
*Corresponding Author – श्री. कऱ्हाळे गोविंद सिताराम*
**DOI - 10.5281/zenodo.17662300**

प्राचीन भारतीय इतिहासामध्ये प्रामुख्याने पृथ्वीच्या उत्पत्ती नंतर मानवाचा जन्म व त्यानंतर त्याच्यामध्ये झालेले बदल आदिमानव व आत्ताचा बुद्धिमान मानव या संपूर्ण कालखंडाचा इतिहास डोळ्यासमोर पुढे उभा राहतो.

खऱ्या अर्थाने संपूर्ण विश्वामध्ये जशी इतर सजीवाप्रमाणे मानवाची उत्पत्ती झाली.. तशीच भारतीय उपखंडामध्ये मानवाची उत्पत्ती होत गेली. तेथ पासून ते आज पर्यंत चा कालखंड पाहता ठळकपणे आपल्याला दिसून येते की आदिवासी समाजाचे भारतीय इतिहास निर्माण कार्यामधील योगदान वेगळे सांगण्याची गरज नाही.

या ठिकाणी मला कवी केशवसुत अर्थात कृष्णाजी केशव दामले यांची 'मनोरंजन' मासिकात मे १९०२ मध्ये प्रकाशित झालेल्या कवितेच्या काही ओळी उद्धृत कराव्यात असे वाटते .

कवी म्हणतात, " आम्हाला वगळा - गत प्रभ झणी होतील तारांगणे | आम्हाला वगळा -विकेल कवडीमोलावरी हे जिणे | "

आदिवासी समाजाशिवाय मानव जातीचा संपूर्ण इतिहास हा अपूर्ण आहे.

आज संपूर्ण मानव जाती पुढे उभ्या असलेल्या सर्व समस्यांचे निदान आदिवासी समाजाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये सापडते. त्यांच्या आचार-विचारात सापडते आपण आज 'शाश्वत विकासासाठी ' ही UNO अंतर्गत UNDP- United nations development programme ने संपूर्ण विश्वाला MDG -Millennium Development Goals 2015 पर्यंत साध्य करणे साठी दिले होते. व त्यानंतर SDG- Sustainable development Goals हे 2030 पर्यंत साध्य करण्याचे आवाहन करत आहेत.या सर्व गोष्टी आदिवासी समाजाने पूर्वीपासूनच साध्य करण्याची स्वयंभू अशी- 'इकोफ्रेंडली जीवनपद्धती' अंगीकारली आहे.

यात 'Inter Generational Equity ' व ' Intra Generational Equity' सुद्धा अंतर्भूत आहे आणि या जीवन पद्धतीमध्ये जेव्हा इंग्रजांनी हस्तक्षेप केला ;तेव्हा त्याच्या प्रत्युत्तरा दाखल आदिवासी समाजाने दिलेला लढा हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील आदिवासी समाजाची भूमिका व योगदान दाखवून देते .

इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अखंड भारतामध्ये जो मोठा लढा

उभारला गेला. जुलमी ब्रिटिश सरकारच्या विरोधात त्यांनी लादलेल्या अन्यायकारक नीती, कायदे व धोरणाच्या विरोधात समाजामध्ये असंतोष निर्माण होऊन वेगवेगळ्या प्रांतांमध्ये वेगवेगळ्या जाती-जमातींमध्ये ब्रिटिश सरकार विरोधात लढा पुकारला गेला.ह्या लढ्याची वर्गीकरण करत असताना 'भारत का स्वतंत्र संघर्ष' या पुस्तकांमध्ये' नागरी और आदिवासी विद्रोह ' या दुसऱ्या प्रकरणात लेखक मा. बिपिन चंद्र व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

1. शहरी उठाव
2. आदिवासी उठाव
3. शेतकरी उठाव

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये आदिवासी समाजाचे योगदान आणि भूमिका पाहत असताना आदिवासी समाजाची जीवन जगण्याची एक आगळीवेगळी पद्धत,संस्कृती व त्यांचे निसर्गाशी असलेले नाते;इको फ्रेंडली जीवन पद्धती प्रामुख्याने आपल्या डोळ्यापुढे येते.

ज्या वेळेला इंग्रज भारतामध्ये आली येथील नागरी वस्तीशी त्यांचा प्रथम संपर्काला आणि ब्रिटिशांनी भारतातील सबंध राजे,प्रांत यांचा सखोल अभ्यास केला व आपल्या फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करत आपला व्यापार वाढवण्याचा प्रयत्न केला. कालांतराने यामध्ये शोषण, भ्रष्टाचार जुलूम,अन्याय, अत्याचार या पद्धतीचा इंग्रज सरकारने वापर करून ;भारताची मोठ्या प्रमाणावर लूट केली.

जोपर्यंत इंग्रज सरकार आदिवासींच्या जल,जंगल आणि जमीन या मध्ये हस्तक्षेप केला नाही; तोपर्यंत आदिवासी समाजाने इंग्रज सरकार विरुद्ध कुठल्याही प्रकारचा उठाव केला नव्हता ;पण ज्या वेळेला इंग्रजांचे व्यापारी धोरण विस्तारत गेले ते आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीपर्यंत पोचले त्या वेळेला आदिवासींनी इंग्रज सरकार विरुद्ध लढा उभारण्यास मनोमन तयारी केली आणि त्याचं प्रत्यक्ष चळवळीमध्ये व सशस्त्र क्रांती मध्ये रूपांतरण झालं.

आदिवासी समाजा प्रामुख्याने निसर्गाशी घट्ट नाते बांधून असलेला, पर्यावरण संरक्षक आपली जमीन, जंगल, पाणी याचा योग्य व पर्यावरण पूरक वापर करणार आहेत केवळ उदरनिर्वाह साठी शेती करणारा हा समाज. जंगलामधून मिळणारे उपज हेही केवळ आणि केवळ उदरनिर्वाहसाठीच होतं.

आदिवासी समाजाचा कुठल्याही प्रकारचा व्यापारी दृष्टिकोन नव्हता आणि म्हणून इतरांनी आपल्या या जगण्यामध्ये, वागण्यामध्ये हस्तक्षेप केलेला त्यांना का बर सहन व्हावा. आणि म्हणून त्यांनी ब्रिटिश सरकार त्यांचे कर वसूल करणाऱ्या अधिकारी उदा. महाजन यांचा जुलूम वाढू लागल्यावर उठावाची तयारी केली. इंग्रजांनी आदिवासी समाजाच्या जमिनी बळकावल्या. शेतकरी आदिवासी शेतमजूर बनू लागला.

काही भागांमध्ये आदिवासी' झूम' व 'पडू 'या प्रकारची स्थलांतरित शेती करत होते. जंगलातील झाड साफ करून तेथे शेती करायची व तिची उपजाऊ क्षमता संपत आली असे लक्षात आल्यावर; दुसरीकडे जंगल साफ करून शेती करायची असा हा प्रकार. पण इंग्रजांनी या प्रकारच्या शेती करण्याला बंधने टाकली. उपजावू जमीन इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतली व आदिवासींना शेतमजूर केले. त्यांच्यावर मोठे कर लादले.

त्यामुळे आदिवासी बेचैन झाला आणि हातात शस्त्र घेतल्याशिवाय त्याला पर्याय उरला नाही. आदिवासी समाजा संघटितपणे लढाईला उभा राहिला या संघर्षामध्ये केवळ इंग्रज सरकारचे कर व जुलमी

धोरणच नाही ;तर जातीय हित सुद्धा महत्त्वाचे कारण ठरले.

या उठावात संथाल.कोल, मुंडा,आंध भिल्ल यासारख्या आदिवासी जातींनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या एकजुटीचे कौतुक करावे तेवढे कमी आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे आदिवासी समाजा बाहेरील लोकांना शत्रू मानत नव्हता. त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये त्यांच्या संस्कृतीमध्ये, कोणी ढवळाढवळ नाही केले तर ते त्यांना आपलंसं करत. त्यांनी बऱ्याच लोकांशी मैत्रीचे संबंध स्थापित केले होते. जसे की लोहार,कुंभार, धोबी यासारख्या लोकांशी त्यांचे नाते जडले होते. आणि 1857 च्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये या लोकांनी आदिवासींच्या बरोबर इंग्रजा विरुद्ध लढाईत हिरहिरीने भाग घेतला आहे. आदिवासींनी एवढे मोठे संघटन उभे केले होते की केवळ एका जाती-जमातीपुरते नसून; संपूर्ण आदिवासी क्षेत्र एकाच वेळी इंग्रजा विरुद्ध लढाई करण्यात उभे राहिले होते. ब्रिटिशां द्वारे केलेल्या हिंसक संघर्षामध्ये अनेक वेळा आदिवासींना विजयी प्राप्त झालेला आहे.

'ओझावो' यासारख्या काही चमत्कारवादी नेत्यांनी आदिवासींना मार्गदर्शन केले.त्यांनी आदिवासींमध्ये असा विश्वास भरला की ईश्वर तुमच्या बरोबर आहे.इंग्रजा विरुद्धच्या लढाईमध्ये तुम्हाला यश प्राप्त होईल. असा आत्मविश्वास निर्माण झाल्याने, बरोबरीची नसलेली ही लढाई अर्थात एकीकडे इंग्रजांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, बंदुका होत्या तर दुसरीकडे आदिवासींकडून दगड, भाले,तीर- कमान यांचा वापर युद्धात होऊ लागला.

या विषम युद्ध साहित्याद्वारे खेळलेल्या लढाईत मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकांचा मृत्यू झालेला आहे.त्यांना वीर मरण आलेले आहे.मातृभूमीसाठी त्यांना प्राण गमावावे लागले आहेत.

**'संथालांचा उठाव ':**

भागलपुर ते राजमहल या दरम्यान चा भाग' दामन-ए -कोह' या नावाने ओळखला जात होता. हा संथाल बहुल क्षेत्र होते.उठावासाठी हजारो संथाल एकत्रित झाले. त्यांनी गैर आदिवासींना या भागातून हाकलून लावण्याची तयारी केली.आणि त्या ठिकाणी आपली सत्ता स्थापन करण्यासाठी जोरदार लढाई सुरू झाली.

या उठावाचे प्रमुख कारण कलकत्ता रिव्ह्यू या वृत्तपत्रांमध्ये छापल्याप्रमाणे "जमीनदार 'पोलीस महसूल विभाग' न्यायालय यांनी संथालावर मोठ्या प्रमाणावर जुलम केला.त्यांच्या जमीनी हिसकावून घेतल्या. प्रत्येक ठिकाणी त्यांचा अपमान केला गेला.त्यांना मारण्यात आले. सत्य बाजू असताना सुद्धा त्यांच्यावर खोटे आरोप करून मोठ्या प्रमाणावर अन्याय करण्यात आला.

त्याच बरोबर त्यांना कर्ज देऊन 50% ते 500 % पर्यंत व्याज वसूल करण्यात आले. श्रीमंत ताकतवान लोक जेव्हा त्यांच्या मनात येईल तेव्हा त्यांना मारून टाकत.त्यांच्या जमिनीमधील उभ्या पिकांवर हातोडी फिरवत.हे अत्याचार आता सामान्य झाले होते.गैर -आदिवासी आणि सरकारी कर्मचारी संथालांवर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप लावून त्यांना गुलाम बनवले होते.

या गोष्टींचा प्रतिकार करण्यासाठी 1854 मध्ये संथाल नेता मजलीस आणि परभगणित यांनी जनमत जागृत करण्यासाठी बैठका घ्यायला सुरुवात केली.आणि जमीनदार, सुतखोर यांना लुटण्याच्या घटना सुरू झाल्या. 30 जून 855 ला भगिनिडीह

भागामध्ये 400 आदिवासी गावामध्ये सहा हजार आदिवासी लोक एकत्र झाले.त्यांनी सभा घेतली आणि एक स्वरामध्ये बाहेरून येणाऱ्या लोकांच्या विरोधात, विदेशी इंग्रजांविरोधात लढून त्यांचे राज्य कायम संपविण्याचा विडा उचलला.आणि राजन्याय व धर्म स्थापन करण्याची शपथ घेतली. संतालांना विश्वास होता की देव त्यांच्या बाजूने आहे.

या उठावातील आदिवासी संथालांचे दोन प्रमुख नेते 'सीदो' व 'कान्हू' यांनी असे सांगितले की, " ठाकुरजीने( म्हणजेच देवाने) आम्हाला आदेश देत म्हटले आहे,की हा देश साहेबांचा अर्थात इंग्रजांचा नाही त्यामुळे देव आपल्या बाजूने लढणार आहे " यामुळे संथालांत आत्मविश्वास निर्माण झाला.

अनेक आदिवासी गावांमध्ये मिरवणूक करण्यात आली. ढोल नगाडे, वाजवत पुरुष व महिला यांना संघर्षात सामील होण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्वांना लढाईसाठी तयार केले.आदिवासींचे नेता हाती, घोडे आणि पालखी वरून मिरवणुकीत सहभागी झाले. खूप कमी वेळात 60 हजार हत्यार बंद संथाल एकत्र आले.

नगाडा वाजला आणि हत्यार घेऊन लोक तयार झाले.या क्रांतिकारकांनी महाजन. जमीनदार या लोकांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यांचे घर जाळून टाकली पोलीस स्टेशन, रेल्वे स्टेशन, पोस्ट ऑफिस यांची जाळपोळ केली जवळपास सर्व गोष्टीची राख- रांगोळी करायला सुरुवात केली. गैर-आदिवासी,इंग्रज सरकारचे अधिकारी यांच्याविरुद्ध सर्व संथालानी मोठा लढा उभारला.

याचा प्रतिकार करण्यासाठी सरकारने एका मेजर जनरलच्या नेतृत्वात दहा तुकड्या पाठवल्या. उपद्रवग्रस्त क्षेत्रात 'मार्शल लॉ' लागू केला.क्रांतिकारक नेत्यांना पकडून दिल्यास 10,000 हजार रुपयांचा इनाम घोषित केला. आणि अन्यायपूर्वक,निरंकुश पणे उठाव दडपून टाकला. 15000 पेक्षा जास्त संथाल मारले गेले. अनेक गावेच्या- गाव उजाड झाली. ऑगस्ट 1855 राजमहल टेकड्या वर संथालांचे रक्त सांडून त्या लाला झाल्या. एल. एस. एस. ओ. ने या घटनेला बहादुरीचे वर्णन करताना म्हटले आहे की,

संथालांनी अदम्य साहस दाखवला. असह्य यातना होऊन सुद्धा त्यांनी माघार घेतली नाही. आत्मसमर्पण केले नाही.

एक वेळेस एका झोपडीत 45 संथाल लपले होते. इंग्रजी शिपाई तेथे गेले त्यांनी झोपडीला घेराव घातला. शिपाई जेव्हा जेव्हा गोळी चालवत होते तेव्हा ते संताल धनुष्यबाण चालवत. जोपर्यंत इंग्रज सैनिकाकडे संथालांचे बाण यायचे थांबले. त्यावेळेला शिपाई झोपडीत शिरले तर एक म्हातारा संथाल जिवंत होता. त्या म्हाताऱ्याला इंग्रजी पायाने आत्मसमर्पण करण्यास सांगितले तेव्हा; तो म्हातारा संथाल इंग्रजी पायावर तुटून पडला. आणि आपल्या कुऱ्हाडीने त्या शिपायाचे तुकडे- तुकडे केले.यावरून लक्षात येते की आदिवासी आपल्या मातृभूमीसाठी,आपल्या वचनासाठी कोणत्याही प्रकारची माघार घेत नाही.जीव गेला तरी चालेल पण आत्मसमर्पण कोणत्याही अटीवर त्यांनी केली नाही.

**'कोल आदिवासींचा उठाव ':**

छोटा नागपूरचे पठारावर 1820 ते 1836 पर्यंत कोल आदिवासी जमातीचा उठाव झाला. हजारो आदिवासींना मारण्यात आले. व ब्रिटिशांनी आदिवासींच्या जल, जमीन,जंगल यावर ताबा मिळवला.

**'रंपा आदिवासी जमातीचा उठाव ':**

आंध्र प्रदेशाच्या समुद्र किनारपट्टी लगत असलेल्या जंगली भागात रंपा आदिवासींचा उठाव झाला.इंग्रज सरकारच्या भ्रष्टाचारी व नवीन जंगल कायद्याच्या विरोधात हा उठाव झाला. 1879 साली या उठावांमध्ये संपूर्ण रंपा जमातीने एकजुटीने प्रतिकार केला. सरकारने हा उठाव दडपण्यासाठी ब्रिटिश सैनिकांची मदत घेतली. पैदल व घोडस्वार सेनेकडू हजारो आदिवासींना अन्यायकारक, हिंस्र पद्धतीने मारण्यात आले 1880 साली हा उठाव दडपण्यात आला.

**'भगवान बिरसा मुंडा यांचे उलगुलान ( उठाव) ':**

जननायक भगवान बिरसा मुंडा यांचा जन्म एका गरीब आदिवासी कुटुंबात 1874 मध्ये झाला. त्यांचे आई-वडील बटाईने शेती करत होते. 1895 मध्ये भगवान बिरसाने स्वतःला देवाचा दूत घोषित केले. त्यांनी आदिवासी बांधवांना असे सांगितले की देवाने आपल्याला आशीर्वाद देत, दैवी शक्ती प्रादान केली आहे.त्यामुळे हजारो आदिवासी त्यांना पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी येऊ लागले. बिरसा आता संपूर्ण मुंडा जमातीचा देव झाला होता.त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर शेतमजुरांचे आंदोलन उभे राहिले.भगवान बिरसा गावागावातून धार्मिक आणि राजकीय आधारावर आदिवासींना सशस्त्र उठावाचे प्रशिक्षण देऊ लागले.

1899 ला भगवान बिरसा मुंडा ने मुंडा जातीचे शासन स्थापन करण्याचे घोषित केले.त्यामुळे त्यांनी ठेकेदार, जमीनदार,राजा,हकीम आणि ईसाई यांना मारण्याचे मुंडा जमातीला आव्हान केले.भगवान बिरसा मुंडांनी म्हटले की, "कलियुगाला नष्ट करण्यासाठी सत्ययुग अनुयात,दिकू म्हणजे गैर आदिवासी यांच्यासोबत आता आपली लढाई आहे. आणि त्यांच्या रक्ताने आपली जमीन अशा प्रकारे लाल होईल की जसा लाल झेंडा दिसतो;परंतु त्यांनी आपल्या बांधवांना हे सुद्धा सांगितले की गरीब गैर-आदिवासींवर आपणशस्त्र उगारायचे नाही."

जवळपास 6000 हजार मुंडा तीर, तलवार,कुऱ्हाड व आणि इतर हत्यार घेऊन बिरसा मुंडा च्या मदतीला धावून आले; पण बिरसा मुंडांना फेब्रुवारी 1900 च्या सुरुवातीला इंग्रज सरकारने अटक केले. जून 1900मध्ये त्यांना जेलमध्ये मारून टाकण्यात आले. व उठाव दडपून टाकला.

परंतु बिरसा मुंडा चे नाव अमर राहिले ज्यांनी लोकांच्या मनामध्ये हिम्मत व आत्मविश्वास निर्माण केला एकजुटीने लढा देण्याची तयारी केली.लोकांच्या मनात अन्यायविरुद्ध आवाज उठवण्याची तयारी केली.

याचप्रमाणे महाराणी दुर्गावती, गोंड राजे रघुनाथ शहा,शंकर शहा, भारताचे रॉबिन हूड म्हणून ओळखली जाणारे तंट्या भिल्ल उंबरे अंध अशाप्रकारे भारतीय इतिहास निर्माण मध्ये आदिवासी समाजाची योगदान राहिलेली आहे..

**भारतीय इतिहास निर्माण मध्ये आदिवासींची भूमिका :**

आदिवासी समाजाची हीच भूमिका होती की स्वातंत्र व स्वयंभु, सार्वभौम आपल्या भूमीवर इतरांचा हस्तक्षेप का बरं मान्य करावा. साधारणता निसर्गाच्या सानिध्यात, निसर्गाशी एकरूप होऊन केवळ उदरनिर्वाहासाठी'झूम' व 'पडू' या प्रकारची शेती करत;आपले आयुष्यात घालवणारे आदिवासी बांधव; यांनी कुठल्याही प्रकारचा व्यापारी दृष्टिकोन न ठेवता, आपले जीवन इको फ्रेंडली व्यतीत करत होते.त्या निसर्गपूजक आदिवासींना इंग्रज सरकारच्या साम्राज्य विस्तारवादी, वसाहतवादी, भांडवलशाही, सत्ता

लोलूप- आचार, विचार व कृतीने केवळ तीर कमान आणि कुऱ्हाड, भाला... यासारख्या सामान्य हत्यारांचा वापर करत इंग्रज सरकारच्या अत्याधुनिक बंदुकी शी व प्रशिक्षित सैनिकाची लढा देण्याची गरज निर्माण झाली; तेव्हा अन तेव्हाच आदिवासींनी त्यांच्यासोबत निकराचा लढा दिला.आपल्या मातृभूमीच्या, आपल्या संस्कृतीच्या रक्षणासाठी प्राण देण्यासाठी हजारो निष्पाप आदिवासी सरसावले आणि त्यांनी इंग्रजा विरुद्ध प्रखर लढा दिला अशा तीन ते चार आदिवासी जमातींचा लढ्याचा या ठिकाणी आढावा घेतला. जसे की संथाल कोल, रंपा आणि मुंडा जमात हीच आदिवासी समाजाची भूमिका होती आणि आहे सुद्धा भारताच्या इतिहास निर्माण कार्यात आदिवासी समाजाचे मोलाचे कार्य दिसून येते याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान आहे.

**सारांश:**

भारताच्या स्वतंत्र चळवळीमध्ये आदिवासी योगदान व भूमिका ही फार महत्वपूर्ण ठरते कारण आदिवासींनी इंग्रज सरकारने बरोबर जो लढा दिला तो इंग्रज सरकारचे प्रशिक्षित सैन्य व त्यांच्याकडील अत्याधुनिक हत्यारे. याउलट आदिवासींकडील तीर कमान, भाला, कुऱ्हाड यासारखे पारंपारिक हत्यारे.ही विषम लढाई होती परंतु त्याही कंडीशन मध्ये आदिवासी क्रांतिकारक, आदिवासींची नेते व सामान्य आदिवासी यांनी पराकोटीचा संघर्ष केला यातून इंग्रज सरकारच्या लक्षात आले की या ठिकाणचा शहरी क्रांतिकारक व आदिवासी क्रांतिकारक यांचे एकच ध्येय होते की:

'भारतीय भूमीचे वसाहतवादी, अन्यायकारक, जुलमी ब्रिटिश शासनापासून संरक्षण करत संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करणे '

**निष्कर्ष:**

1. भारताच्या इतिहास निर्माण मध्ये आदिवासी समाजाची भूमिका व योगदान उल्लेखनीय आहे.
2. आदिवासी समुदाय भारत भूमीचा खरा रक्षक आहे.
3. संथाल, मुंडा,कोल, रंपा,आहे आंध,भिल.. अशा विविध जमातींचा उठाव वाखण्याजोग आहे.
4. ब्रिटिशांच्या शोषक वृत्तीचा आदिवासीने तीव्र विरोध केला.
5. आदिवासींची जीवनपद्धती जगात आदर्श आहे.
6. मातृभूमीसाठी प्राण गेला तरी बेहतर पण कोणत्याही अटीवर आत्म समर्पण नाही. हे आदिवासींच्या ब्रिटिश सरकार विरोधाच्या संघर्षातून सिद्ध झाले.

**संदर्भ:**


1. 'भारत का स्वतंत्रता संघर्ष - बिपिन चंद्र ( पान क्रमांक 15 ते 20 )
2. UNDP वेबसाईट https://www.undp.org/
3. प्राचीन भारत R. S. शर्मा https://officerspulse.com/wp-content/uploads/bsk-pdf-manager/2020/06/Ancient-India-RS-Sharma.pdf
4. डॉक्टर किरणजी देसले भारतीय अर्थव्यवस्था https://drkirandesale.com/economics
5. राष्ट्र निर्माण मे आदिवासी- डॉ. जितेंद्र मीणा युवान बुक्स पब्लिकेशन ऑगस्ट 2025 (पेज 137 )